वर्ष : १३ / अंक : १

# आदित्यदीप

जानेवारी ते मार्च २०२२



अखेरचा हा तुला दंडवत !

जानेवारी ते मार्च २०२२ शके १९४३

"आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।।"



# आदित्यदीप



कार्यकारी संपादक
सौ. अपर्णा अभ्यंकर

(आदित्य प्रतिष्ठानचे वार्तापत्र)

संस्थापक-संपादक
गुरुदेव शंकर अभ्यंकर

वर्ष : १३ अंक : १

## अंतरंग


संपादकीय – अमृतलता गेली गगनावरी! – सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर ५

शिवछत्र हरपले – सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर १०

श्रीकाशी विश्वेश्वराचे पुनरुत्थान – सौ. सुलभा श्रीकांत आठवले १३

महान संत रामानुजाचार्य – गुरुदेव १६

मोदीजींची यशोगाथा – सौ. रश्मी अरुण तुळजापूरकर २०

श्रद्धांजली – कथक सम्राट पं. बिरजू महाराज २४

– पद्मश्री सिंधूताई सपकाळ २४

– मा. श्री. यशवंतराव पटवर्धन २६

– मा. श्री. श्रीकान्त अभ्यंकर २६


आजीव सभासद वर्गणी रु. २०००/- (१० वर्षांसाठी) आजच आदित्यदीपचे वर्गणीदार व्हा!

# गुरुदेवांना राष्ट्रीय पुरस्कार






मध्यप्रदेश सरकारचा मानाचा पुरस्कार 'राष्ट्रीय नानाजी देशमुख सम्मान' भोपाळ येथे मा. मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते गुरुदेवांना दि. २६ जानेवारी २०२२ रोजी प्रदान.

## वन्दे भारतम्








यावर्षी ७५ व्या प्रजासत्ताक दिना निमित्त दिल्ली येथे संपन्न झालेल्या सोहळ्यामध्ये राजपथावरील संचलनात प्रथमच शास्त्रीय नृत्यकलेची निवड करण्यात आली. त्यासाठी अखिल भारतीय नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात २०० नृत्यसमूह व २४०० हून अधिक कलाकार सहभागी झाले होते. त्यातील पुण्याच्या **कथकगुरु तेजस्विनी साठे** यांच्या १० विद्यार्थिनींची अंतिम फेरीत निवड झाली. त्यामध्ये ललित कला केंद्रात एम ए करणाऱ्या **अरुंधती अभ्यंकर**चा समावेश आहे. ती नृत्य विशारद झाली असून ललित कला केंद्र ची विद्यार्थिनी आहे.



संपादकीय

# अमृतलता गेली गगनावरी!



– सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर

दि. ६ फेब्रुवारीची सकाळ उजाडली ती दुष्ट बातमी घेऊनच! गेले २८ दिवस दीदी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होत्या. तेव्हापासून मन कातर झाले होते; पण आज जेव्हा दीदी गेल्याची बातमी ऐकली तेव्हा क्षणभर काळजाचा ठोकाच चुकला! आणि अश्रू अनावर झाले. आता दीदी पुन्हा आपल्याला दिसणार नाहीत, त्यांचा गोड स्वर कानावर पडणार नाही ही कल्पनाच सहन होईना! दीदींचा ध्वनिमुद्रित अमृतस्वर दररोज ऐकणारे कोट्यवधी लोक आहेत; पण दीदींची प्रत्यक्ष भेट, त्यांच्याशी गप्पा असे अनुभवणारे थोडे भाग्यवंत! त्यातले आम्ही आहोत.

गेली ९३ वर्षे ही अमृतलता बहरत राहिली, गान फुलांचा वर्षाव करत राहिली त्यामुळे दीदींनी करोडो भारतवासियांच्या आणि परदेशस्थ बांधवांच्या मनात जे स्थान निर्माण केले आहे ते अन्य कोणीही करू शकणार नाही.

लहानपणापासून आपल्या चित्ताला आनंद झाला तो दीदींच्या गाण्याने. 'धीरेसे आजा रे अखिनय मे निंदिया-' ऐकत आम्ही झोपी गेलो, 'ज्योती कलश झलके' म्हणत जागे झालो, असंख्य अभंग ऐकत तृप्त झालो. 'कल्पवृक्ष कन्येसाठी' ऐकताना वडिलांच्या आठवणींनं गहिवरलो, 'ए मेरे वतन के लोगो–' म्हणत जवानांसाठी सद्गदित झालो, 'तुम आशा-विश्वास हमारे-' ऐकत पुढच्या पिढीबद्दल आशा जागवल्या. एक का दोन अशा विविध भाषेतील पंचवीस हजार गाण्यांनी दीदींनी आमचे भावविश्व समृद्ध केले, म्हणून दीदी आपणा सर्वांच्या 'गानसरस्वती माता' झाल्या.

दि. २८ सप्टेंबर १९२९ या दिवशी इंदोर येथे या स्वरशीतल चंद्रप्रभेचा जन्म झाला. त्यांचे पाळण्यातील नाव 'हृदया' असे ठेवण्यात आले. बाबा दीनानाथ मंगेशकर आणि माई-शुद्धमती यांच्या पोटी शुद्ध स्वर गळ्यात घेऊनच हे बाळ जन्माला आले. वयाच्या पाचव्या वर्षीच त्या अशा काही गाऊ लागल्या की आपल्या मुलीच्या गळ्यात शुद्ध गंधार आहे याची जाणीव त्यांच्या वडिलांना झाली. बाबांनी त्यांना सांगितले, 'तुझ्या गायन गुरुपेक्षा मोठी हो'. वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी नूतन थिएटरमध्ये खंबावती राग व दोन नाट्यपदे गाऊन त्यांनी लोकांमध्ये गायला सुरुवात केली. तेथपासून ८० व्या वर्षापर्यंत म्हणजे ७० वर्ष त्यांनी जनमनावर अधिराज्य केले. म्हणजे बालपणाची अल्लड, भावंडांबरोबर मजा, मस्करी करण्याची १० वर्षे आणि नंतर शेवटची १० वर्षे म्हणजे तृप्ततेचे, विसाव्याचे क्षण, हे वगळता त्या ७० वर्षे कुटुंबासाठी, मग रसिकांसाठी, मग देशासाठी गातच राहिल्या. वडील दीनानाथ मंगेशकर गेल्यावर त्यांनी पूर्ण घर सावरले. त्यांची देवावर नितांत श्रद्धा. त्यामुळे त्यांनी 'प्रभुकुंज' घर असेच निवडले की जेथून महालक्ष्मी मंदिर जवळ आहे. त्यांच्या या श्रद्धेमुळे त्यांच्या गाण्याला सात्त्विकतेचा स्पर्श झाला. त्यांना देशात-परदेशात मिळून २५० सन्मानचिन्हे आणि

१५० गोल्ड डिस्क सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. २००१ मध्ये भारतातील सर्वोच्च असा 'भारतरत्न' पुरस्कार त्यांना देण्यात आला. जणू त्या पुरस्काराचाच गौरव झाला.

अशा या दीदींशी आमचा परिचय २० वर्षांपूर्वी झाला आणि त्याला कारणीभूत झाली पंडित हृदयनाथ मंगेशकर आणि गुरुदेव शंकर अभ्यंकर यांची झालेली प्रगाढ मैत्री. २००० मध्ये आदित्य प्रतिष्ठानच्या 'सामवेद' या छोट्या स्टुडिओच्या उद्‌घाटनाला पंडितजी आले. मग काही प्रवचनांना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले, मग अनेकदा भेटी-गाठी झाल्या, मैत्री वाढली. पंडितजी 'अमृताचा घनु' हा कार्यक्रम करतात. यात ज्ञानेश्वरांचे अभंग व पंडितजींचे संगीत व दीदींनी म्हटलेली गाणी पंडितजी सादर करतात. त्या दोन गाण्यांच्या मधले निरूपण गुरुदेव अभ्यंकर करू लागले आणि मग हा कार्यक्रम ५-६ तास चालायचा. इतका तो रंगू लागला. दोघेही एकमेकांना मधेमधे प्रश्न विचारत. गुरुदेव दीदींविषयी, चालींविषयी प्रश्न विचारत आणि पंडितजी संत ज्ञानेश्वर माउली, अध्यात्म याविषयी गुरुदेवांना प्रश्न विचारत. गाणी, चाली आणि शब्द या सर्वांवर श्रोत्यांच्या टाळ्यांचा वर्षाव होत असे. याचा प्रयोग लंडन येथेही झाला आणि या २०-२५ कार्यक्रमांचे फलित म्हणजे पंडित हृदयनाथ मंगेशकर व गुरुदेव शंकर अभ्यंकर यांच्या ओळखीचे प्रगाढ मैत्रीत रूपांतर.

मग तो सोनियाचा दिवस उजाडला. दीनानाथ मंगेशकर स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी २४ एप्रिलला पुरस्कार दिले जातात. दि. २३ एप्रिल २००४ या वर्षी तो कार्यक्रम विलेपार्ले येथील दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह येथे संपन्न झाला. तेथे 'अमृताचा घनु' कार्यक्रम करण्यात आला. समोर ऐकायला प्रत्यक्ष दीदी बसलेल्या होत्या आणि सर्वच मंगेशकर कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रम रंगत चालला. दीदी लक्षपूर्वक ऐकत होत्या. टाळ्या पडत होत्या. कार्यक्रम संपत आला आणि पंडितजींनी अचानक दीदींना हाक मारली- 'दीदी, व्यासपीठावर येतेस का?' दीदी उठल्या. त्यांच्या लाघवी पद्धतीने नमस्कार करत व्यासपीठावर आल्या आणि अनपेक्षितपणे दीदींनी एक सुंदर संवादिनी म्हणजे पेटी अभ्यंकरांना सन्मान करून भेट दिली. आम्हाला तो सुखद धक्काच होता. आजही दीदींनी दिलेली ती पेटी आमच्या स्टुडिओमध्ये दिमाखात विराजमान आहे आणि गुरुदेवांची बोटे त्या पेटीच्या सुरांवर नित्य फिरत असतात.



यानंतर आणखी एक अनपेक्षित घडलं! कार्यक्रमाची सांगता दीदींनी गायलेल्या पसायदानाने झाली. शेजारी बसून दीदी गात आहेत या भावनेने गुरुदेव रोमांचित झाले होते.

यानंतर मग दीदींच्या भेटी अनेकवेळेला घडल्या. त्यांच्या गुडघ्याचे ऑपरेशन झाले तेव्हा त्यांना भेटायला आम्ही दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये गेलो होतो, तेव्हा दीदींनी खूप आठवणी सांगितल्या. तो ठेवा आम्ही हृदयसंपुटात सदैव जतन करून ठेवला आहे. त्यांच्या घरी त्यांना भेटायला गेल्यावर आठवणींचा, अनुभवांचा खजिनाच आमच्यासमोर उघडला जायचा. ह्यांनी एकदा दीदींना विचारलं की आपल्याला गाणं येतंय ही जाणीव तुम्हाला केव्हा झाली? त्या हसल्या आणि म्हणाल्या पाचव्या वर्षापासून मी गातेच आहे. म्हणजे खरोखरच त्या उपजताची गानज्ञानी होत्या.

त्यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन कार्यक्रमाचा सोहळा अगदी घरगुती प्रमाणात संपन्न झाला. त्यालाही उपस्थित राहण्याचे भाग्य आम्हा दोघांना लाभले.

त्यांना 'स्वर माउली' या पदवीने कोल्हापूरच्या शंकराचार्यांकडून सन्मानिले गेले तेव्हाही गुरुदेवांची उपस्थिती दीदींना हवी होती त्यामुळे त्या कार्यक्रमातही आम्ही आनंदाने सहभागी झालो. त्याची काही क्षणचित्रे –





सप्टेंबर २०१८ ला मीनाताईंनी आपल्या बहिणीबद्दल अत्यंत मनोज्ञ आठवणी सांगणारा ग्रंथ लिहिला- 'मोठी तिची सावली' त्याचे प्रकाशन गुरुदेव शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रम थिएटरमध्ये झाला. परंतु त्याआधी घरी दीदींच्या उपस्थितीत प्रकाशन झाले. आमच्या आठवणीतला तोच दीदींबरोबरचा शेवटचा सोहळा. पण त्या आठवणी मनात चिरतरूण राहतील. त्याची काही क्षणचित्रे –









दि. ४ एप्रिल २०११ हा आमच्या व आदित्य प्रतिष्ठानच्या भाग्यातील अत्यंत मोलाचा दिवस कारण त्या दिवशी दीदींनी प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा मानाचा **'लक्ष्मी-वासुदेव पुरस्कार'** अत्यंत आनंदाने व कृतज्ञतेने स्वीकारला. प्रतिष्ठानच्या सर्वच कार्यकर्त्यांनी व तुडुंब भरलेल्या श्रोत्यांनी हा सोहळा मोठ्या कौतुकाने पाहिला. त्या दिवशी दीदींच्या हस्ते गुरुदेवांच्या 'गीतासागर' ग्रंथाच्या ८ व्या आवृत्तीचे प्रकाशन झाले हे आमचे भाग्यच होय. त्याची क्षणचित्रे –









आमचे परम भाग्य असे की दीनानाथ स्मृति प्रतिष्ठान पुरस्कार सोहळ्यात दि. २४ एप्रिल २००८ या दिवशी गुरुदेव अभ्यंकरांना 'वाग्विलासिनी' पुरस्काराने गौरवण्यात आले. दि. २४ एप्रिल २०१५ या दिवशी मला 'आदिशक्ती गौरव पुरस्कार' देण्यात आला. हे आमचे भाग्य!



दीदींची स्मृती इतकी लख्ख की एकदा भेट झाल्यावर मी त्यांना म्हटलं, 'दीदी परवा मी 'हम दोनो' पाहिला. त्यातली तुमची गाणी- माझं वाक्य पूर्ण व्हायच्या आधीच त्या उद्गारल्या, 'सर्वांना त्यातलं 'अल्ला तेरो नाम' आवडतं. पण मला मात्र 'प्रभू तेरो नाम' आवडतं.' स्वत: गायलेल्या हजारो गाण्यांपैकी पटकन त्यांनी ती दोन गाणी सांगितली! आश्चर्य आहे ना?

ईश्वरदत्त लांबसडक दाट केशकलाप, भावविभोर टपोरे नेत्र, बालकासारखे निरागस हास्य, पराकोटीची विनम्रता, संभाषण चातुर्य, विलक्षण स्मरणशक्ती,

गुणग्राहकता, दोन्ही खांद्यावरून पदर घेतलेली सदैव शुभ्र रंगाची साडी, पायात सोनेरी पैंजण, हिऱ्याच्या कुड्या आणि पाचू वा हिऱ्याची अंगठी ही आपल्या दीदींच्या व्यक्तिमत्त्वाची विलोभनीय वैशिष्ट्ये होती. ती. बाबा आणि माई ही त्यांची श्रद्धास्थाने होती. सावरकर आणि शिवाजी महाराज ही त्यांची स्फूर्तिस्थाने होती. भारत देश हा त्यांचा अभिमान होता. क्रिकेट हा त्यांचा आवडीचा विषय होता. स्वर्गीय निखळ शुद्ध स्वर हा त्यांचा प्राण होता. फोनवर त्या बोलत ते सुद्धा ऐकत रहावे असे वाटे.

एका कार्यक्रमात गुरुदेव अभ्यंकर भाषणात म्हणाले होते, 'जगातील सर्व लोकांनी आणि देशांनी परमेश्वराकडे पैसा, संपत्ती, भूमी, स्त्रिया, इंधन, सोने असे पुष्कळ मागितले. स्मित करणाऱ्या भारतीयांनी मात्र परमेश्वराला प्रार्थना करताना म्हटले, 'आम्हाला फक्त 'लता मंगेशकर' द्या.' ईश्वर म्हणाला, 'तथास्तु'. आणि मग त्याने लतादीदींना भारतात पाठवले.'

खरंच आपण भारतवासी विशेषत: महाराष्ट्रातील लोक भाग्यवान आहोत की दीदी येथे जन्मल्या.

मी एकदा ह्यांना म्हटलं होतं मला लता मंगेशकर यांना भेटायचे आहे. ती माझी इच्छा ह्यांच्यामुळे पूर्ण तर झालीच पण वारंवार भेटीचा सुवर्णयोगही माझ्या आयुष्यात आला.

या दोन वर्षात मात्र कोरोनामुळे प्रत्यक्ष भेटीचा योग आला नाही तरी व्हाट्सअप वरून त्या गुरुदेवांना नित्य भेटत असत. त्यांची जुनी गाणी पाठवत असत. छान फुले पाठवत असत. मला वाटते त्यांच्या गाण्यामुळे त्यांचे मन सदैव प्रसन्न व निर्मळ राहिले होते.

त्यांनी आपल्या भावंडांवर खूप प्रेम केले. तसेच दीदींचे भाग्य असे की भावंडांनी त्यांच्यावर खूप प्रेम केले. पंडितजींची दीदींवर नितांत प्रेम व श्रद्धा. दीदी त्यांना छोटा गुरु म्हणत. पंडितजींनी अवघड चाल लावावी आणि दीदींनी ती अधिक अवघड व सुंदर करून गावी असे अनेकदा घडले. 'राजा शिवछत्रपती' आणि 'अमृताचा घनु' या त्यांच्या रेकॉर्ड त्यामुळे विक्रमी विक्रीच्या आणि लोकप्रिय ठरल्या. उषाताई सतत सावलीसारख्या त्यांच्याबरोबर असत आणि भारतीताई या सर्व भावंडांना एकत्र बांधून ठेवणाऱ्या प्रेमरज्जू आहेत.



दीदींनी भा. रा. तांबे यांची एक कविता गायली आहे–

'मी जाता राहील कार्य काय ।
जन पळभर म्हणतील हाय हाय ।'


परंतु दीदी, तुम्ही गायलेली गाणी आणि तुम्ही उभारलेले दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल यांच्या रूपाने पळभर नाही तर निरंतरपणे तुम्ही आमच्या मनात रहाल. तुम्ही पूर्ण व कृतार्थ आयुष्य जगलात. त्यामुळे तुम्ही म्हणत असाल की,

'संपूर्ण जाहला जीवनयज्ञ
पूर्णाहुती मी देतसे ।
या स्वरातून त्या सुरातून
अमृतलता मी होतसे ।।'

या परते लिहावे तरी काय?

* * *

# शिवछत्र हरपले!



– सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर

आज हा लेख लिहिताना मा. बाबासाहेब पुरंदरे यांच्या अनंत स्मृती मनात दाटून आल्या आहेत.

गेली शंभर वर्षे शिवचरित्राचे बाळकडू धारण केलेले बाबासाहेब पुरंदरे नामक कृपाछत्र दि. १५ नोव्हेंबर २०२१ ला अनंतात विलीन झाले. या बाळाने पहिली मूठ वळली असेल ती शिवचरित्राचा झेंडा हातात घेऊनच. श्रीमंत सरदार घराण्याचा वारसा धारण करून, वडिलांचे वक्तृत्वाचे संस्कार मनावर कोरून घेत बाबासाहेबांनी शिवचरित्राचा झेंडा हातात धरिला तो शेवटच्या श्वासापर्यंत! मन भरून येते आणि अश्रूंना पापण्या बांध घालू शकत नाहीत. लहानपणापासूनच्या अनंत आठवणी मनात दाटून आल्या आहेत.

बाबासाहेब आमच्या सातारच्या घरी अनेकदा येत. माझ्या वडिलांचे ते अगदी जिवलग मित्र. सातारच्या राजमाता कै. सुमित्राराजे भोसले यांच्या प्रोत्साहनाने, कै. मुकुंदराव दाबके, माझे वडील कै. अच्युतराव कोल्हटकर, कै. अण्णा नाईक अशा काही जणांनी मिळून बाबासाहेबांची पहिली जाहीर व्याख्यानमाला तिकीट लावून सातारच्या जलमंदिरात आणि नंतर राजवाड्यासमोरच्या मैदानात आयोजिली आणि संपन्न केली. ते शिवचरित्र संस्कार अजूनही माझ्या मनात ताजे आहेत. विलक्षण भारलेले दिवस होते ते! बाबासाहेब ऐन उमेदीत होते. त्यामुळे शिवचरित्र सांगतानाचा त्यांचा जोश, आवेश, तल्लीनता, सनावळ्या लख्ख पाठ असणे, नर्म विनोद, हातवारे, अभिनय हे सगळे मला आठवते आहे. मी दहा वर्षांची असेन! घरी आल्यावर आई जेवायला वाढेपर्यंत माझ्या आजोबांशी, योगदर्शनकार बाबा कोल्हटकर यांच्याशी ते खूप गप्पा मारत बसत. तोपर्यंत माझे वडील मागची आवरासावर बघून घरी येत. त्यानंतर हसत खेळत जेवणे होत. मी मात्र बुजून त्यांचे बोलणे ऐकत बसलेली असे. कारण त्यांनी सांगितलेल्या शिवचरित्राचा विलक्षण प्रभाव मनावर असे.

पुढे १५-२० वर्षांनंतर ते 'जाणता राजा'चे भारलेले दिवस आले. तोपर्यंत माझे लग्न झाले होते आणि मी श्री. शंकर अभ्यंकर यांची सहचारिणी बनले होते. 'ह्यांची' व बाबासाहेबांची भेट झाल्यावर बाबासाहेब 'ह्यांना' म्हणाले, 'तुम्ही आमचे जावई आहात'! 'ह्यांनी' लिहिलेले 'मुद्रा भद्राय राजते' हे शिवचरित्र काव्य बाबासाहेबांना अतिशय आवडले होते. त्यातील प्रतिदिनी एक गीत न्यू इंग्लिश स्कूलच्या पटांगणावर झालेल्या शिवचरित्र व्याख्यानमालेत 'हे' गात असत. सरदार दाभाडेंनी ह्यांचा त्यासाठी सत्कारही केला होता.

'जाणता राजा' या नाट्याचे पहिले वाचन श्री. भाऊसाहेब पटवर्धन यांच्या मॉडेल कॉलनीतील बंगल्यावर झाले. ७-८ तास वाचन झाले. हे एवढे मोठे नाट्य यशस्वी होणार का? लावणी कशाला त्यात? खर्च केवढा होईल? इत्यादी चर्चा सुरू झाल्या. परंतु सर्व प्रथम 'ह्यांनी' म्हणजे अभ्यंकरांनी उठून बाबासाहेबांचे अभिनंदन केले आणि विलक्षण सुंदर प्रयोग होईल अशी संहिता

आहे असे आग्रहाने अनुमोदन दिले. पुढे मग त्याचे एडिटिंग करून मग त्याचे रेकॉर्डिंग सुरू झाले आणि त्यातील प्रसंगानुरूप काव्याची जबाबदारी बाबासाहेबांनी ह्यांच्यावर सोपवली. 'ह्यांनी' ही जबाबदारी कॉलेज व इतर व्याप सांभाळून आनंदाने स्वीकारली. पहिलाच प्रसंग आला जनाबाईंच्या अभंगाचा आणि ह्यांनी काव्य रचले–

'माहेराची वाट माझी जाते पंढरीसी ।
राऊळात नांदे माझा, द्वारका निवासी ।'

अभंग वाचून बाबासाहेब खूष झाले आणि म्हणाले, 'अभंग कोणत्या गाथेतून तर नाही घेतला तुम्ही?' आणि जोरात हसले. इतका तो समर्पक झाला होता. बाबासाहेब असे नर्म विनोद नेहमी करत असत. पुढे अशी अनेक गीते 'ह्यांनी' लिहिली. चटकन आठवतात ती अशी- 'आता जो जो रे शिवबाळा, ऊर भरून आलंय रं माझं- माझं शिवबा आमुचं राजं, स्वर्ग आला रायगडी, उबल रहा है लहू रगोमे, मौज आज करलो भा--, राज्याभिषेकाची सगळीच गीते इत्यादी कितीतरी.

शेवटची भैरवी –

'ज्ञानेशांच्या पसायदाना मूर्तरूप आले ।
श्रीशिव छत्रपती झाले ।'

हे तर अनेक कडव्यांचे गीत! नाट्याचा परमोत्कर्ष! पण शब्दही तितकेच उत्कट लिहिले गेले 'ह्यांच्या'कडून! चालही सुरेख. त्यामुळे सारेच भारले जातात! मला आठवतंय काही वेळेला बाबासाहेबांचा रात्री फोन येई उद्या सकाळी डेक्कन क्वीनने मुंबईला रेकॉर्डिंगसाठी जाणार आहे, मला अशा अशा प्रसंगावर ओळी लिहून हव्या आहेत. पहाटे श्री. प्रतापराव टिपरे येऊन कवितेचा कागद घेऊन जात.

'जाणता राजा'मध्ये लेखनाइतकेच काव्यालाही महत्त्व आहे. त्यामुळे माझ्यासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब ठरली. मग त्याच्या तालमी, माझ्या आईने त्यात केलेले जिजाऊसाहेबांचे काम, माझ्या वडिलांची रात्रंदिवस धावपळ, ह्यांनी कॉलेज सांभाळून केलेली लागेल ती मदत, असे ते मंतरलेले दिवस! कै. श्री. प्रतापराव टिपरे यांचीही अखंड मेहनत होती यामध्ये. याचा शेवटचा मी पाहिलेला प्रयोग ३ वर्षांपूर्वीचा. सारेच कलाकार बदललेले. मात्र ९६ वर्षांचे बाबासाहेब समोर प्रयोग पहायला बसलेले. मी त्यांच्या मागच्या ओळीत होते. सगळे वेळेवर प्रवेश करत आहेत ना याकडे त्यांचे बारकाईने लक्ष. प्रयोग संपताना ताडकन् उठून त्यांनी महाराजांना तीन वेळा मुजरा घातला. अशी त्यांची जाज्वल्य निष्ठा! म्हणून तर ते 'महाराष्ट्रभूषण' झाले! या महाराष्ट्रभूषण पुरस्कार समारंभ सोहळ्यास प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे भाग्य आम्हा दोघांना लाभले.

बाबासाहेबांच्या अंत:करणात प्रखर राष्ट्रनिष्ठा होती. संघाचे स्वयंसेवक होतेच. एकदा संघ स्थानावर एका स्वयंसेवकाच्या हातून झेंडा पडत होता. बाबासाहेब तो घेण्यासाठी इतके तातडीने धावले, त्यांनी तो पकडला आणि त्यांना झेंड्याचा अपमान होतोय या भावनेने चक्कर आली. इतके ते तरल व प्रखर भावनेचे होते. याला साक्षीदार होते माझे वडील.

बाबासाहेबांच्या विनोदवृत्तीचा आणखी एक प्रसंग आठवतोय. 'ह्यांनी' 'झांशीच्या राणी'वर स्लाईडशो करावयाचे ठरविले. झांशीला जाऊन प्रत्यक्ष तिथला अभ्यास करून त्या जागांचे फोटो काढायचे होते. अभ्यंकर नेहमीप्रमाणे बाबासाहेबांचा आशीर्वाद घ्यायला गेले. त्यांनी आवर्जून सांगितले की झाशीच्या राणीसाहेबांच्या लग्नाची पत्रिका तेथील मठात आहे. ती मला मिळाली नाही. बघा तुम्हाला मिळाली तर अवश्य फोटो काढून आणा.' 'हे' परत आल्यावर आम्ही बाबासाहेबांकडे गेलो. 'हे' म्हणाले, 'बाबासाहेब मिळाला पत्रिकेचा फोटो!' त्यांनी विचारले 'अरे वा! कसे काय?' हे हसत

म्हणाले, 'त्या मठात मला पेटी दिसली. मग सेवा म्हणून २-४ भजने म्हटली. मग ते महाराज प्रसन्न झाले. फोटो काढायला प्रेमाने परवानगी दिली.' बाबासाहेब उद्गारले, 'अजून २-३ भजने म्हटली असतीत तर तुम्हाला जावई करून घेतले असते' आणि माझ्याकडे बघून मिस्किल हसले.

त्यांना वाफेचा वरण-भात, तूप, मीठ, लिंबू फार आवडे. पुरणपोळी, लाडू हे आवडीचे पदार्थ. मसालेभातही आवडे. एकदा मी त्यांना भात वाढत होते. एकदम म्हणाले, 'थांब! थांब!' मला वाटले माझे काही चुकले की काय? तर हसत म्हणाले, 'ते काजू-बेदाणे दिसताहेत ना, तिथपर्यंतचा भात वाढा!' अशा अनंत आठवणी! अगदी छोट्या मुलालासुद्धा ते 'राव' ही उपाधी लावून हाक मारत. आणि महाराजांचे नाव त्यांनी घेतले नाही असा एकही संवाद होत नसे.

आदित्य प्रतिष्ठानच्या सर्व प्रकाशनांना, कार्यक्रमांना, कीर्तनाला, बाबासाहेब आवर्जून उपस्थित राहात. आदित्य प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा मानाचा 'लक्ष्मी-वासुदेव कलाभूषण पुरस्कार' त्यांना दिला गेला. संत विद्यापीठाचे भूमिपूजन आम्ही त्यांच्याच शुभहस्ते केले. एका चांदण्या रात्री इथे कार्यक्रम करू म्हणाले होते, पण ते होणे नव्हते!




बाबासाहेबांना शंभरावे वर्ष लागल्यावर आम्ही दोघे व आमची दोन्ही मुले भेटायला गेलो होतो. त्यांना गजान्त लक्ष्मी दिली. शाल पांघरली आणि मी घरी केलेले पौष्टिक लाडू त्यांना दिले. ते त्यांनी प्रेमानी खाल्ले. तासभर खूप गप्पा मारल्या. श्रमले होते. पण बुद्धी तशीच तल्लख! बोलता बोलता म्हणाले की मला स्वभावत:च हिरे, मोती, खडे याची खूप जाण आहे. सोन्यात मढवलेली अस्सल रुद्राक्षाची माळ काढून दाखवली. म्हणाले, 'मला पारखायला आणून दिली आहे एकानी.' मला एकदम आठवलं! मी त्यांना म्हटले, 'बाबासाहेब! सातारला एकदा तुम्ही ओंजळभर किमती खडे घेऊन आला होता व आईला दाखवत होता ते आठवते आहे!'

एकदा पाहिले माझ्याकडे आणि त्यांच्या खास शैलीत म्हणाले, 'माणिक' रत्न होते ते!' म्हणजे तू फार लहान होतीस. तुला काहीच समजत नव्हते, हा भावार्थ.

निघताना हे बाबासाहेबांना म्हणाले, 'तुम्ही जगदंबेचे भक्त आहात. तृप्त आहात. जगदंबा प्रसन्न झाली तर काय मागाल?' काही मिनिटे स्तब्ध झाले. मग म्हणाले, 'मोक्षाचा मोह होतोय, पण अजून खूप काम करायचे आहे. तेव्हा उत्तम जन्म मागेन.' आम्ही उठलो. नमस्कार केला. बाबासाहेबांनी हात जोडले. ह्यांनी पटकन त्यांचे हात धरले. त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. ते उद्गारले 'हे आनंदाचे, समाधानाचे अश्रू आहेत बरं का!' मुलांना भरभरून आशीर्वाद दिले. ते क्षण आम्हा सर्वांच्या हृदय संपुटातील माणिक रत्ने आहेत.

बाबासाहेब! तुम्ही लवकर पुनर्जन्म घ्या आणि पुढच्या पिढ्यांना तुमचे ते व्याख्यानाच्या सुरुवातीचे मंतरलेले शब्द ऐकायला मिळू देत–

'आदिशक्ती श्री तुळजा भवानी---'

* * *

# श्रीकाशी विश्वेश्वराचे पुनरुत्थान

– सौ. सुलभा श्रीकांत आठवले

***परकीय आक्रमकांनी वारंवार उद्ध्वस्त केलेले आम्हा हिंदूंचे परम श्रद्धास्थान म्हणजे काशी विश्वेश्वर! स्वातंत्र्यानंतरही ७० वर्षे ते तसेच राहिले, पण पंतप्रधान मोदीजींच्या मनात काशीचे पुनरुत्थान करायचे निश्चित होते. तसा 'मास्टर प्लॅन' त्यांनी केला आणि प्रत्यक्षात आणला सुध्दा! त्याची गौरवशाली कहाणी.***



**काशीचे महत्त्व –** मोक्षदायक सप्तपुरींपैकी पवित्रतम, सर्वश्रेष्ठ पुरी म्हणजे काशी. 'काश्यां तु मरणान्मुक्तिः' म्हणजेच काशीतील मरण मुक्ती मिळवून देते. काशीलाच बनारस, वाराणसी असे म्हणतात. मार्क ट्वेन परदेशी, परधर्मीय असून काशीची महती गाताना म्हणतो, 'बनारस (काशी) इतिहासाहून प्राचीन आहे, परंपरेहून प्राचीन आहे. पुराण आख्यायिकेहून प्राचीन आहे.' काशी हे शैव क्षेत्र असून द्वादश ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. हे क्षेत्र शिवाच्या त्रिशुलावर वसले असून प्रलयकाळातही त्याचा नाश होणार नाही अशी पुराणांतरी ख्याती आहे. शिवशंकरांच्या तेजाने ही नगरी प्रकाशित झालेली आहे असे स्कंद पुराणात (२६.६७) सांगितले आहे. शिवस्वरूप, ज्ञानस्वरूप काशी क्षेत्र सश्रद्ध हिंदू धर्मियांचा श्वास आहे. हे शिवाचे चिरंतन धाम आहे. धर्मपीठ आणि विद्यापीठ असा काशीचा दुहेरी महिमा आहे. ही नगरी संस्कृतीचे, विद्येचे व तत्त्वज्ञानाचे माहेरघर म्हणून पुरातनकाळापासून प्रसिद्ध आहे. वैदिक धर्म इथूनच सर्वदूर प्रसारित झाला.

अशा या ख्यातनाम नगरीतील काशी विश्वनाथ मंदिराचा महिमा काय वर्णावा! अलौकिक ऊर्जा आणि चैतन्यमय असे हे भक्तिपीठ, पण त्याचे दिव्य स्वरूप मुस्लिम आक्रमकांच्या क्रौर्यामुळे उद्ध्वस्त झाले. मुहंमद घोरीपासून औरंगजेबापर्यंत या मंदिरावर पुन:पुन्हा हल्ले करण्यात आले. ११ व्या शतकापासून या क्रूर हल्ल्यांनी काशी विश्वनाथाचे वैभव झाकोळले गेले.

**काशीची दुरवस्था –** वाढत्या लोकसंख्येबरोबर

येथील समस्याही तीव्र होऊ लागल्या. गंगेत स्नान करून विश्वनाथाच्या मंदिराकडे जावे तर सर्व चिंचोळ्या गल्ल्या, भाविकांची गर्दी, दुकानदारांचा कलकलाट, जनावरांचा वावर, उघडी गटारे, पसरलेले शेण आणि कचरा असे चित्र अनुभवाला येत होते. लांबच लांब रांगेतून वाट पाहात कधीतरी देवाचे दर्शन व्हायचे. गंगेचे पाणी प्रदूषित होत होते. नदीकिनारी आणि मंदिराच्या जवळ असलेल्या पुरातन मंदिरांवर आणि सुंदर इमारतींवर स्थानिकांनी आक्रमण करून बेबंद आणि ओंगळवाणे बांधकाम केले होते.

परममंगल शिवदर्शनाला जावे तर मन खिन्न होऊन दुखावलेच जायचे. महंमद घोरीच्या राजवटीत कुतुबुद्दीन ऐबकने, फिरोजशहा तुघलक आणि औरंगजेब यांनी १२ व्या, १४ व्या आणि १७ व्या शतकात मंदिर उद्ध्वस्त केले. औरंगजेबाने तर तिथेच ग्यानवापी मशीद बांधली. १८ व्या शतकात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी मशिदीजवळच पुनश्च विश्वेश्वराचे मंदिर बांधले, जे सध्याचे मंदिर आहे. त्यांनी शास्त्रोक्त पद्धतीने विश्वनाथाची प्राणप्रतिष्ठा केली. या अपूर्व योगदानामुळे श्रीविश्वनाथधामच्या इतिहासात अहिल्यादेवींचे स्थान अढळ आहे. हिंदूधर्माभिमानी तोडरमल, महाराज रणजितसिंह यांचेही मंदिर उभारणीत योगदान होते.

काळ पुढे जात राहिला, पण मंदिराची अवस्था सुधारण्यासाठी, परिसराचा विकास आणि स्वच्छतेसाठी भारताच्या पहिल्या पंतप्रधानांपासून, पंडित नेहरूंपासून राजीव गांधींपर्यंत कुणीही काशी विश्वनाथ मंदिराचे रूप बदलू शकले नाही. अटलजींना बहुमताची साथ मिळाली नाही.

**पंतप्रधान मोदीजींनी केला कायापालट –** हिंदूंचे हे पवित्र मंदिर पुनश्च वैभवसंपन्न का होत नाही ही हिंदूंची वेदना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाणली. त्यांच्या अधिकारात त्यांनी २०१८ साली 'श्रीकाशी विश्वनाथ स्पेशल एरिया डेव्हलपमेंट बोर्ड'ची स्थापना केली. त्यातूनच काशी कॉरिडॉरचे भव्य काम पूर्णत्वाला गेले. सोमवार, दि. १३ डिसेंबर २०२१ या दिवशी मोदीजींनी या प्रकल्पाचे लोकार्पण केले. हा सोनियाचा दिवस भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला. काशी विश्वनाथाचे पावित्र्य, सौंदर्य तर झळाळलेच पण जोडीला भारतातील समस्त ज्योतिर्लिंगे तेजाळली. सश्रद्ध हिंदूंच्या अंगावर आनंदाने रोमांच उभे राहिले आणि मोदीजींच्या स्वरात स्वर मिसळून 'हर हर महादेव' हा मंत्र हृदयात घुमला. मोदीजींनी कडाक्याच्या थंडीतही गंगेत स्नान करून, सूर्याला अर्घ्य देऊन जप केला. भक्तिभावाने काशी विश्वनाथ मंदिरात प्रवेश करून मनोभावे पूजा केली. त्या षोडशोपचार पूजेने लक्षावधी हिंदू भाविकांचे स्वप्न पूर्ण केले. शेकडो वर्षांच्या वेढ्यांतून मोदीजींनी काशी विश्वनाथ मंदिर मुक्त केले.



**पंतप्रधान नरेंद्र मोदीजी विश्वनाथाची पूजा करताना**

काशी कॉरिडॉर हा प्रकल्प अभिमान वाटावा असाच साकारला आहे. मंदिराच्या भव्य प्रांगणात गंगा नदीत स्नान करून पूजा करण्यासाठी येणे, तेही प्रशस्त, सुंदर मार्गाने, शक्य झाले आहे. स्वच्छता गृहे, अतिथी निवास, संग्रहालय, सांस्कृतिक केंद्र, सुरक्षा विभाग, धार्मिक पुस्तक विक्री केंद्र, प्रसाद केंद्र अशा अनेक सुविधा केल्या आहेत.

या प्रकल्पासाठी मंदिराच्या परिसरात गंगा नदीपर्यंतची घरे आणि दुकाने मोबदला देऊन ताब्यात

घेतली. जागा मोकळी केली. घरे पाडत असता घरांमध्ये दडलेली जुनी, सुंदर मंदिरे जतन करण्यात आली. सर्व कामात स्थानिकांचे सहकार्य मिळवण्यात आले. प्रथम विरोध करणारे नंतर समर्थक झाले. भाविकांची संख्या वाढून संपूर्ण काशी नगरीचेच महत्त्व वाढत जाईल हे निश्चित!

लोकार्पण सोहळ्यात मोदीजींच्या भाषणामुळे हिंदू समाजाला एक नवी उभारी मिळाली. ते म्हणाले,

'हे लोकार्पण भारताला निर्णायक दिशा देईल. एका उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जाईल. हा परिसर आपल्या कर्तव्याचा, सामर्थ्याचा साक्षीदार आहे. निर्धार ठाम असेल, जिद्द असेल तर काहीही अशक्य नाही. प्रत्येक भारतीयाकडे ती शक्ती आहे. आम्हाला तपस्या माहीत आहे. तपश्चर्या माहीत आहे. आव्हान कितीही मोठे असले तरी आपण भारतीय मिळून त्याचा पराभव करू शकतो. विनाश करणाऱ्यांची शक्ती भारताच्या शक्तीपेक्षा, भारताच्या भक्तीपेक्षा मोठी असू शकत नाही. ज्या न्यूनगंडाने भारत पछाडला होता त्यातून आजचा भारत बाहेर पडत आहे.

आजचा भारत केवळ सोमनाथ मंदिराची शोभा वाढवत नाही तर समुद्रात हजारो किलोमीटरचा ऑप्टिकल फायबरही टाकत आहे. केवळ बाबा केदारनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करत नाही तर स्वत:च्या बळावर भारतीयांना अवकाशात पाठवण्याची तयारी करत आहे... हजारो वर्षांच्या या पुरातन काशीमधून मी प्रत्येक देशवासीयाला आवाहन करतो- 'संपूर्ण आत्मविश्वासाने सर्जनाची कास धरा, नवे पायंडे निर्माण करा. अभिनवतेची कास धरा.'

काशीला विश्वनाथाची नगरी म्हणतात. या विश्वनाथाच्या मंगल आशीर्वादाने हिंदू समाजाला अभिमान वाटेल असा भव्य, सुंदर, कमालीचा स्वच्छ आणि आधुनिक परिसर मंदिराच्या भोवती निर्माण करण्यात आला आहे.

शेकडो वर्षांच्या आक्रमणांमुळे, मुस्लीम शासकांच्या क्रौर्यामुळे हिंदू समाजाने आत्मविश्वास गमावला होता. काशी विश्वेश्वर श्रद्धावान हिंदू समाजाला तो नक्कीच परत मिळवून देणार आहे.

***।। हर हर महादेव ।।***

* * *



**काशी विश्वेश्वर मंदिर परिसराचे पालटलेले देखणे रूप**

# श्रीरामानुजाचार्य

– गुरुदेव

***महान संत रामानुजाचार्यांच्या जन्माला सहस्राब्दी वर्ष म्हणजे १ हजार वर्ष पूर्ण झाली. या निमित्त हैद्राबादला श्रीरामनगर जीवा आश्रमाजवळ २१६ फूट उंचीची अष्टधातू प्रतिमा 'स्टॅच्यू ऑफ इक्वालिटी' नावाने उभारण्यात आली. एक हजार वर्षांपूर्वी रामानुजाचार्यांनी समाजामध्ये भक्तीचा प्रसार केला. त्यासाठी ही प्रतिमा उभारण्यात आली. हे मंदिर ४५ एकर जमिनीवर उभे करण्यात आले आहे. २५ करोड रुपयांचे म्युझिकल फाऊंटन व त्याद्वारा त्यांचा जीवनपट उलगडण्यात येणार आहे. त्यांचे जीवनकार्य सांगणारा हा लेख!***



भारतीय परंपरेतील एक महान आचार्य आणि विशिष्टाद्वैत दर्शनाचे उद्गाते. शंकराचार्यांच्या अद्वैत मतानंतर रामानुजांच्या विशिष्टाद्वैत मताचा प्रभाव भारतातील उपासकांवर विशेष करून दक्षिण हिंदुस्थानातील साधकांवर आहे. रामानुजांची थोरवी यातच प्रस्थापित होते.

रामानुजांचा कालखंड सामान्यत: इ. स. अकरावे व बारावे शतक असा मानण्यात येतो. एका परंपरेप्रमाणे यांचा कालखंड इ. स. १०१७ ते ११३७ असा आहे, तर दुसऱ्या परंपरेप्रमाणे तो इ. स. १०७७ ते ११५७ असा आहे. परंतु रामानुजांना दीर्घ आयुष्य लाभले यात मुळीच शंका नाही. चेन्नईच्या नैऋत्येला सुमारे तीस मैलांवर असलेल्या श्रीपेरुम्बुदुर या खेड्यात यांचे आई-वडील राहात असत. त्यांच्या वडिलांचे नाव आसुरी केशव दीक्षित, तर आईचे नाव कांतीमती असे होते.

हे दोघेही अत्यंत धार्मिक आणि सनातन धर्म जपणारे होते. विवाह होऊन बरीच वर्षे गेल्यावरही पोटी पुत्र जन्माला आला नाही, हा सल केशव दीक्षितांच्या मनात होता. वंश पुढे चालावा म्हणून पत्नीसह तपश्चर्या करण्यासाठी ते थिरुअल्लीकेनी या स्थळी पार्थसारथीच्या प्रार्थनामंदिरात येऊन दाखल

झाले. कांतीमती आणि केशव दीक्षित या दोघांनी त्या पवित्र स्थळी उपासना केली. केशव दीक्षितांना इथे प्रत्यक्ष परमेश्वराचा दृष्टांत झाला.

***जन्म आणि शिक्षण –*** दैवी संकेताप्रमाणे कांतीमतीच्या पोटी शुभलक्षणांनी युक्त असा एक मनोहारी पुत्र जन्माला आला. त्याची शुभलक्षणे पाहून दीक्षितांनी त्याचे नाव रामानुज असे ठेवले. अनुज म्हणजे भाऊ. रामाचा अनुज म्हणजे लक्ष्मण असा अर्थ झाला. लक्ष्मण म्हणजे आदिशेषाचा अवतार आणि श्रीराम हा विष्णूचा अवतार. हा हिंदुसंस्कृतीतील संकेत तर प्रसिद्धच आहे.

बाळपणापासूनच यांनी अलौकिक बुद्धिमत्ता आणि लोकविलक्षण धारणाशक्ती प्रकट केली. श्रुतिपटलावर पडलेले कोणतेही वचन त्यांना क्षणार्धात मुखोद्गत होई. त्यांचे वय जसे वाढू लागले तशा भक्तीच्या सर्व खुणा त्यांच्या ठायी आपोआपच दिसू लागल्या.

लहानपणापासून यांची उदार दृष्टी आणि सर्वांठायी ईश्वर पाहण्याची सर्वज्ञता प्रकट होऊ लागली.

सोळाव्या वर्षी यांचा विवाह झाला. परंतु सूनमुख पाहिल्यानंतर महिन्याभरातच दीक्षितांचे निधन झाले. अवघ्या कुटुंबावर दुःखाचा जणू डोंगरच कसळला. या आपत्तीतून बाहेर पडण्यासाठी आणि यांचे उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी दीक्षितांचे कुटुंब कांचीपूरम्ला येऊन स्थिरावले. यांनी संस्कृत भाषा, व्याकरण आणि वेदांचा अभ्यास आपल्या वडिलांच्या मार्गदर्शनाखाली केला होता. वेदांत आणि तत्त्वज्ञानाच्या सर्व शाखा सांगोपांग अभ्यासण्यासाठी त्यांचे मन आसुसलेले होते. कांची येथे यादवप्रकाश नावाचे अद्वैत वेदांताचे प्रसिद्ध आचार्य राहात होते. यांनी त्यांच्या गुरुकुलात प्रवेश घेऊन अभ्यासाला प्रारंभ केला.

परंतु काही कालखंडानंतर गुरुशिष्यांमध्ये संस्कृत ग्रंथांच्या अन्वयार्थाबद्दल मतभेद होऊ लागले. यांचा पिंड भक्तोत्तमाचा होता तर यादवप्रकाश अद्वैती होते.

यांचे अंत:करण भक्ताचे आहे, अशी कीर्ती वैष्णव संप्रदायाचे महान आचार्य यामुनाचार्य यांच्या कानी आली होती. हे सुद्धा यामुनाचार्यांना भेटण्यासाठी निघाले. दुर्दैवाने या भेटीपूर्वीच यामुनाचार्यांचे निधन झाले. यांना अत्यंत वाईट वाटले. तीव्र आवेगापोटी यांना मूर्च्छा आली. त्या महान वैष्णवाचार्यांच्या मृतदेहाचे दर्शन घेत असताना यांना एक विशेष गोष्ट लक्षात आली. यामुनाचार्यांच्या पंजाची मधली तीन बोटे यांनी दुमडलेली पाहिली. आपल्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा मनात असतानाच यामुनाचार्यांना मृत्यू आला असे लोकांनी यांना सांगितले. यामुनाचार्यांच्या अपूर्ण इच्छा कोणत्या होत्या हे मात्र कुणालाच माहीत नव्हते. यांच्या शिष्यवर्गाला ही गोष्ट अज्ञात असल्याचे पाहून यांनी ध्यान केले आणि अंतःप्रेरणेने यामुनाचार्यांच्या इच्छा ज्ञात करून घेतल्या. त्या तीन इच्छा कोणत्या ते स्वत: यांनीच घोषित केले,

१) वैष्णव संप्रदायाचा गौरव वाढवून, वैष्णव संप्रदायातच राहून ब्रह्मसूत्रांवर भाष्य लिहिणे आणि आत्मशरणाचे महान तत्त्व भक्तांना शिकविणे.

२) धर्मग्रंथांवर भाष्य लिहून त्यांचा सत्यार्थ प्रकट करणे.

३) पराशर आणि शठकोप यांना उपाधि प्रदान करणे.

वैष्णव असे मानतात की यांनी या तीन घोषणा केल्यावर यामुनाचार्यांच्या हाताचे एकेक बोट आपोआप सरळ झाले. जणू काही त्यांनी रामानुजांना आशीर्वादच दिला.

***गृहत्याग व संन्यासदीक्षा –*** या घटनेनंतर त्यांनी संन्यास घेतला. त्यांच्याभोवती कांचीतच अल्पावधीत बरेच शिष्य गोळा झाले. त्यांना वेदांताची आणि वैष्णव संप्रदायाची शिकवण हे देऊ लागले. या शिष्यांमध्ये धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास केलेला

कुरेश नावाचा शिष्य होता आणि यांच्या आयुष्यात तो फार मोठी कामगिरी करणार होता. यांनी संन्यास आश्रम धारण केल्यानंतर घडलेली सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे यांचे गुरु यादवप्रकाश हेच यांचे शिष्य झाले. यांनी त्यांचे 'गोविंदजीर' असे नामकरण करून त्यांना वैष्णव संप्रदायात सामील करून घेतले.

***आचार्यपद –*** पुढे हे श्रीरंगम्ला येऊन दाखल झाले आणि भक्तीची प्रचंड लाट दक्षिणेत उसळली. यांच्या अगोदरच अलवार संतांनी दक्षिण भारताच्या मातीला भक्तीचा गंध दिलेलाच होता.

श्रीरंगम् देवस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर यांनी एक-दोन अपवाद वगळता आपले उर्वरित आयुष्य रंगनाथाच्या चरणीच व्यतीत केले. एक सहस्र सूत्रे असलेल्या नम्माळवारांच्या तामीळ प्रबंधावर यांनी प्रवचने देण्यास प्रारंभ केला. यांची प्रवचने ऐकण्यासाठी सहस्रावधी भक्त गर्दी करू लागले. नम्माळवारांनी श्रीशैल तिरुपती म्हणजे साक्षात भूवैकुंठ असे वर्णन केले आहे. यांनी अनंताचार्य या आपल्या शिष्याला तिरुपतीकडे रवाना केले आणि तिरुपतीचे संकुल वर्धिष्णु करून ते समृद्ध करण्याची आज्ञा त्यांना दिली.

तमिळवेद (नालायिर दिव्यप्रबंधम्) यांनी केवळ लोकप्रिय केला असा नव्हे तर त्यातील चार सहस्र भजने लोकांच्या ओठावर खेळतील असा भक्तीचा सुदूर प्रसार केला.

श्रीभाष्य संपन्न केल्यानंतर यांनी संपूर्ण भारताची परिक्रमा केली.

रामानुजांचा शिष्य कुरेश यांच्या पोटी दोन जुळी मुले जन्माला आली. त्यांच्या दोन्ही मुलांची नावे यांनी पराशर आणि व्यास अशी ठेवली. अशा रीतीने यामुनाचार्यांची तिसरी इच्छा या घटनेने पूर्ण झाली.

आपल्या दीर्घ आयुष्यात यांनी वैष्णव संप्रदायाचा ध्यास घेतला. वैष्णव संप्रदायाचा सातत्याने प्रचार केला आणि अत्यंत कृतार्थतेने माघ शुद्ध दशमी शनिवारी दुपारी सन ११३७ मधे आपला देह ठेवला.

यांच्या शिकवणुकीचे सार थोडक्यात असे सांगता येईल, 'आपल्या आध्यात्मिक गुरुप्रमाणे पवित्र महात्म्यांची पूजा बांधा. आचार्यांच्या शिकवणुकीवर पूर्ण श्रद्धा ठेवा. इंद्रियांचे दास होऊ नका. केवळ भौतिक माहितीवर संतुष्ट राहू नका. ईश्वराची थोरवी सांगणाऱ्या ग्रंथांचे वारंवार परिशीलन करा. परमेश्वराच्या नामसंकीर्तनात नित्य तल्लीन व्हा. ईश्वराला शरण जाल तरच तराल. खरा वैष्णव हा कधीही स्वार्थी असत नाही. स्वार्थत्यागी व्हा आणि लोकांची सेवा करा. ईश्वराकडे जाण्याचे भक्तिशिवाय अन्य मार्ग आहेत असे म्हणणाऱ्या नास्तिकांचा सहवास टाळा. श्रीभाष्याचा नित्य अभ्यास करा. श्रीभाष्य वाचणे हीच परमेश्वराची सेवा आहे. सर्व संतांची वचने पाठ करा. अहंकाराचे समूळ उच्चाटन म्हणजेच मुक्ती आहे. आपले मित्र कोण व शत्रू कोण, आस्तिक कोण नास्तिक कोण याचे तुम्हाला सदैव भान असू दे. करुणाघन परमेश्वराचे नित्य स्मरण ठेवा आणि त्याची प्रार्थना करण्यास कधीही विसरू नका.'

***विशिष्टाद्वैत –*** भारतीय तत्त्वज्ञानातील हे एक महत्त्वाचे व लोकप्रिय दर्शन आहे. या दर्शनाचे हे उद्गाता असल्यामुळे या दर्शनाला 'रामानुजीय दर्शन' असेही म्हणतात. रामानुजांनी ब्रह्मसूत्रांवर जे भाष्य लिहिले आहे, ते 'श्रीभाष्य' म्हणून ख्यात आहे. त्यामुळे विशिष्टाद्वैताला श्रीसंप्रदाय असेही दक्षिणेकडे संबोधिले जाते.

यांचे विशिष्टाद्वैत म्हणजे वेदांताच्या भक्तिदर्शनाचे विहंगम रूप आहे. आदि शंकराचार्यांनंतर ब्रह्मसूत्रांचा इतका सखोल अर्थ उलगडून दाखविणारे हेच पहिले महान् आचार्य होत. वल्लभाचार्य, निंबार्काचार्य, मध्वाचार्य आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या सर्व शाखा उपशाखा यावर रामानुजप्रणित ईश्वरवादाचा मोठा


प्रभाव आहे. यांच्या मते ईश्वर हेच सर्वोच्च तत्त्व आहे. विविध संप्रदायांनी आणि भक्तिवेदांत दर्शनांनी त्यांना पुरुषोत्तम, नारायण, वासुदेव, कृष्ण अशा नावांनी संबोधले आहे. वैष्णव संप्रदायाच्या संदर्भातील ग्रंथ वा स्तोत्रे लिहिताना यांचे हृदय भक्तीने उचंबळून आले असले तरी श्रीभाष्यात यांची तर्कशुद्ध विचारसरणी प्रकटली आहे.

ईश्वराची प्राप्ती प्रवचनांनी, बुद्धीच्या प्रकर्षाने किंवा पुष्कळ विद्याध्ययनाने होत नाही. हा परमात्मा ज्या भक्ताची निवड करतो त्यालाच आपले स्वरूप तो उलगडून दाखवत असतो. त्यासाठी अनन्यभक्तीचाच आश्रय भक्ताला करावा लागतो.


***उपसंहार*** – ब्रह्मवादी नव्हे, तर ईश्वरवादी तत्त्वज्ञानाचे हे सर्वप्रथम उद्गाते होत. यांच्या भक्तिसंकल्पनेचाच विस्तार उत्तरकालीन आचार्यांनी आणि संतांनीही केला आहे. ब्रह्म हेच ईश्वर आणि ईश्वर हेच ब्रह्म हा सुस्पष्ट उद्घोष यांनी केला. ब्रह्मविद्या आणि ईश्वरोपासना यांच्या समन्वयाचा यांचा प्रयत्न लक्षणीय आहे. हे करताना यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे शंकराचार्यांना अनुसरावे लागले आहे. तरीही भक्तियोगाला यांचे योगदान प्रचंड आहे, ही गोष्ट निर्विवाद सत्य आहे.

* * *



आदित्य प्रतिष्ठानची समृद्ध वैचारिक संपदा




आवृत्ती १० वी




आवृत्ती ७ वी




आवृत्ती ११ वी

संपूर्ण सूची मागवा किंवा ग्रंथ / सीडी / पेनड्राईव्हज्साठी
पहा– www.adityapratishthan.org

# मोदीजींची यशोगाथा

**– सौ. रश्मी अरुण तुळजापूरकर**



इ. स. २०१४ पूर्वी भारतातील सुजाण नागरिकांना देशाच्या स्थैर्याविषयीची चिंता विलक्षण त्रस्त करत होती. कारण म्हटलं तर थोडीफार वैज्ञानिक प्रगती सुरू होती पण भ्रष्टाचार, महागाई, बेशिस्त, अनिती, जातीजातीत भांडणे इतक्या प्रमाणात वाढले होते की या राष्ट्राला काही भवितव्य राहणार आहे का नाही असा प्रश्न प्रत्येक सुजाण नागरिकाला भेडसावत होता. प्रत्येकाला तीव्रतेने वाटत होते की या देशाला उत्तम नेता, उत्तम सरकार लाभले पाहिजे. परदेशी संबंध, अणुक्षेत्र, देशांतर्गत महामार्ग, अर्थव्यवस्था अशा अनेक क्षेत्रात प्रगती करणारे आणि तो प्रगतीचा योग क्षेम राखणारे सरकार आले पाहिजे.

**भारतीय जनता पक्ष सत्तारूढ –** देशहिताला प्राधान्य देणारा नेता आणि त्याच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणारे सरकार आले पाहिजे. ही सुजाण नागरिकांची इच्छा पूर्ण झाली आणि इ. स. २०१४ मध्ये मतपेटीतून परिवर्तन होऊन भाजपचे सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या मार्गदर्शनाने कार्यरत झाले. स्थापन झाले. दि. २६ मे २०१४ रोजी मोदीजींनी पंतप्रधान-पदाची शपथ घेतली. त्यांना मिळालेले पद, तो पंतप्रधानपदाचा मुकुट काटेरी होता. सरकारी यंत्रणेतील सुस्तावलेपण, मस्तवालपण, लालफीतशाही, बाबूगिरी, कोणत्याही कामासाठी सरकारी कचेऱ्यात खेटे घालणे यामुळे जनता हवालदिल झाली होती. व्यक्तिगत काम सरकार दरबारी न्यायचं तर प्रचंड खेटे घालावे लागत होते, पैसे चारावे लागत होते आणि एवढे करूनही काम होईल याची खात्री नव्हती. निवडून आलेले उमेदवारही आपण लोकांचे काम करण्यासाठी जबाबदार आहोत हे विसरून मिळालेल्या सत्तेने पैसा कसा जमा करू हाच विचार करत होते. तेव्हा जनतेला दिलासा देणे आणि मंत्र्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देणे हे फार मोठे आव्हान मोदीजींच्या समोर होते. मात्र त्यांनी सुस्तावलेल्या यंत्रणेला कार्यरत करण्याचे, सुसूत्रतेत बांधण्याचे आव्हान स्वीकारले आणि हळूहळू त्यात यश प्राप्त केले. त्यामुळेच २०१४ ते २०१८

हा कालावधी यशस्वीरितीने पूर्ण करून त्यांनी २०१९ मध्ये पुनश्च सत्ता प्राप्त केली आणि ते पंतप्रधानपदी आरूढ झाले. सत्ताधिकारी ज्ञान आणि ज्ञानाधीन सत्ता याचा अनुभव सुखावू लागला.

**एक भारत, श्रेष्ठ भारत –** मोदीजींनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा सखोल अभ्यास केला आहे. म्हणूनच अतुल्य भारताबरोबरच एकात्म भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी ते २०१४ पासून कार्यरत आहेत. त्यांनी 'एक भारत, श्रेष्ठ भारत' ही संकल्पना राज्यांसमोर ठेवली. देशातील विविध राज्यांनी आपल्या संस्कृती-परंपरांची देवाण-घेवाण करावी आणि देशाला एकसंध ठेवावे असे ते आग्रहाने सांगत आले आहेत.

देशातील सगळ्यात शेवटच्या पायरीवरचा माणूस हा त्यांच्या कामाचा आरंभबिंदू ठेवून त्यांनी सबका साथ-सबका विकास हे सूत्र घेऊन काम केले. तर दुसऱ्या टप्प्याची सुरुवात सबका साथ- सबका विकास - सबका विश्वास या सूत्राने केली आहे. स्वामी विवेकानंदांना अपेक्षित उदयमान भारत निर्माण करण्याच्या दिशेने मोदीजींची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

**मोदीजींच्या देशहिताच्या योजना –** सात वर्षे झाली मोदीजी पंतप्रधानपदी कार्यरत आहेत. या सात वर्षात त्यांनी केलेल्या कामांचा आढावा घ्यायचा तर एखादा उत्तम ग्रंथ तयार होईल जो नेतृत्व करणाऱ्या विश्वातील प्रत्येक व्यक्तीला मार्गदर्शक ठरेल. त्यांनी केलेल्या कार्याचा, योजनांचा थोडक्यात उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल–

आयुष्मान भारत, बेटी बचाओ-बेटी पढाओ, नोटाबंदी, बुलेट ट्रेन, भ्रष्टाचार विमुक्त भारत, करोना मुक्त भारत, अयोध्या दिवाळी, डिजिटल भारत, खेडेगावातही वीज पुरवठा, गॅस पुरवठा, स्वच्छतागृहे, दीपज्योती विमा योजना, मेक इन इंडिया, सर्जिकल स्ट्राईक, तिहेरी तलाक रद्द, काश्मीर ३७० कलम, योग दिन या आणि अशासारख्या अनेक योजना मोदीजींनी यशस्वीपणे राबवल्या. दोन-अडीच वर्षात करोनावरील लस शोधून, देशात अधिकाधिक लोकांना ती योजनाबद्धतेने पुरवून, इतकेच नव्हे तर परदेशांनाही ती पुरवून फार मोठे वैश्विक कार्य भारताकडून झाले आहे. 'विश्वधर्म' व्यक्त करणारे असेच हे कार्य आहे. प्रेरणा अर्थात आ. मोदीजींची! दृष्टी मोदीजींची!

एकीकडे माणसाचे आयुष्मान वाढत असताना दुसरीकडे लहान वयातील व्याधीग्रस्तता वाढत आहे. या परिस्थितीत देशातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणारी आयुष्मान भारत ही योजना मानवी मूल्यांचा सन्मान करणारी ठरली आहे. केवळ आर्थिक विकास नाही तर देशातील जनतेने आरोग्यपूर्ण आनंदी जीवन जगावे यासाठीचे मोदींजींचे प्रयत्न ही त्यांची यशोगाथा आहे. नोटबंदीमुळे बाहेर आलेला काळा पैसा भ्रष्टाचार रोखू शकेल.

**'मोदीजींचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील यश' –** देशांतर्गत समस्या सोडवतानाच मोदीजींनी भारताला आंतरराष्ट्रीय स्थानही प्राप्त करून दिलं आहे.

सर्जिकल स्ट्राईकमुळे घेतलेला उरी सैन्यतळावरील हल्ल्याचा प्रतिशोध, मोदीजींच्या कठोर भूमिकेमुळे झालेली विंग कमांडर अभिनंदन यांची सुटका या दोन घटनांनी बदलता भारत जगाला दिसू लागला. जगातील बलिष्ठ देश भारताच्या बाजूने उभे राहिले हे मोदीजींनी कमावलेलं यश आहे.

मोदीजींचं यश पुढील काही घटनांमधून जाणून घेण्यासारखं आहे.

१) ब्रिटनमधील ५३ देशांच्या परिषदेचे अध्यक्षपद मोदीजींना लाभले. २) युनायटेड नेशन्स ह्यूमन राईटस् कौन्सिलमध्ये भारताला १८८ मते प्राप्त. ३) जगातील २५ शक्तिशाली देशांमध्ये भारत चौथ्या क्रमांकावर. (अनुक्रमे- अमेरिका, रशिया, चीन). ४) जीएसटी मासिक कर जमा- १ लाख करोडच्या वर (महामारी काळात). ५) सोलर पॉवर प्लान्टस उभे करण्यात भारत दुसऱ्या स्थानावर.

६) जमीन, समुद्र, आकाश या तिन्ही ठिकाणांहून क्षेपणास्त्रे पाठविणाऱ्या देशात भारताचा समावेश. ७) ७० वर्षात पाकिस्तानने प्रथम आर्थिक दारिद्र्य अनुभवले, पाकिस्तानला जगापासून वेगळे पाडले. ८) फ्रान्स बरोबरची राफेल खरेदी आणि रशियाकडून एस-४०० ची खरेदी- मोदीजींनी शक्य करून दाखवली. ९) जम्मू काश्मीरमधील जवानांना बुलेट प्रूफ जॅकेटस् उपलब्ध करून दिली. १०) जागतिक आर्थिक परिस्थितीत गेल्या ६-७ वर्षात भारत सहाव्या स्थानावर. ११) ऑटो मार्केटमध्ये भारत ४ थ्या स्थानावर. १२) वीज निर्मितीत तिसऱ्या स्थानावर. १३) कापड उद्योगात भारत दुसऱ्या स्थानावर. १४) मोबाईल निर्मितीत भारत दुसऱ्या स्थानावर. १५) स्टील (लोखंड) निर्मितीत भारत दुसऱ्या स्थानावर. १६) साखर निर्मितीत भारत प्रथम स्थानावर.

**सर्वांसाठी आदर्श पंतप्रधान –** आपल्या सहकाऱ्यांना त्यांनी कार्यमग्नतेचं आणि शिस्तीचं उदाहरण घालून दिलं आहे. गेल्या सात वर्षात एकदाही सुटीवर न जाण्याचं- कर्तव्यदक्ष राहण्याचं उदाहरण घालून दिलंय. एखाद्या कुटुंबप्रमुखाप्रमाणे देशातल्या प्रत्येक नागरिकाशी 'मन की बात'मधून नातं जोडायला शिकवलं आहे. मिळालेलं पद हे 'सेवापद' आहे याची सतत जाणीव स्वत:च्या कामातून आणि प्रधान सेवक म्हणून घेण्यातून त्यांनी दाखवली आहे. निर्णय घेणं, धाडसाने नि:स्वार्थपणे काम करणं यशाकडे नेतं- पण त्यात काही जोखीमही पत्करावी लागते. जो काम करतो तोच हे करू शकतो. क्वचित काही त्रुटी जाणवल्या, लोकांकडून कळल्या तर त्यावर साधक-बाधक विचार करून, त्या क्षेत्रातील लोकांशी विचारविनिमय करून समाजहिताचा, देशहिताचा निर्णय घेणं ही मोदीजींची पद्धतच त्यांच्या यशाचे गुपित आहे.

मोदीजींच्या कृपेने आज आपल्याला अनेक कामं घरबसल्या, मोबाईलवरून, संगणकावरून ऑनलाइन करवून घेता येतात. त्याची प्रक्रीया सोपी झालेली दिसते. त्याला लागणारा वेळही प्रचंड प्रमाणात कमी झाला आहे. पासपोर्ट, वीज बिलांपासून बँकींग व्यवहारापर्यंत अनेक अनुभव सांगता येतील. काहीजण म्हणतील हे शंभर टक्के होत नाही. पण तसेही होईल. उत्तम साध्य व्हायला काळ जावा लागतोच आणि आपणही किती कसे योगदान देतो महत्त्वाचे असतेच. मोदीजी त्यांच्या सहकाऱ्यांसह पूर्णत्वाने कार्य करत आहेत आणि म्हणूनच काशी विश्वेश्वर त्यांना यश देतोय.

आम्ही जेव्हा काशीला गेलो होतो तेव्हा तेथील पुजाऱ्याने आम्हाला आता या परिसराचा कसा कायापालट होणार ते सांगितलं होतं. ते भव्यदिव्य रूप इतक्या झटपट प्रत्यक्षात उतरेल असं वाटलं नव्हतं. काशी कॉरिडॉर टी.व्हीवरून पाहताना धन्य वाटलं. कृतार्थ वाटलं- मुख्य कर्ता नि:स्वार्थ असला आणि राष्ट्रभक्त असला की अशी एकच नव्हे तर अनेक कामे करून दाखवतो, यश मिळवतो आणि मग त्याचा कार्यकाल हा 'यशोगाथा' म्हणावा लागतो.

मोदीजींच्या कार्यपद्धतीने परदेशस्थ भारतीयांना भारताबद्दल आत्मियता, अभिमान वाटेल अशी स्थिती निर्माण झाली आहे. जगातील नेतृत्वांशी नरेंद्र मोदींनी निर्माण केलेले वैयक्तिक संबंध व विश्वास उल्लेखनीय आहे. मोदीजींच्या जीवनाला असलेला आध्यात्मिक पाया, प्रचारक म्हणून कार्य करताना त्यांनी डोळसपणे पाहिलेला हा देश, या देशाच्या महान परंपरेची सूज्ञ जाणीव यामुळे आलेला त्यांच्यातील व्यक्तिगत साधेपणा आणि सर्वांबद्दल असलेला आपलेपणा यामुळेच ही यशोगाथा रचली जात आहे.

**अध्यात्मसंपन्न मोदीजी –** गुजराथचे मुख्यमंत्री म्हणून १५ वर्षे, पंतप्रधान म्हणून ७ वर्षे कार्य करताना 'इदं न मम' ही त्यांची वृत्ती क्षणोक्षणी

दिसली आहे. भ्रष्टाचाराचा एकही आरोप त्यांच्यावर नाही. सुडबुद्धीने झालेल्या अशा आरोपातून मोदींचे सोने अधिकच उजळले! त्यांची उच्च नीतिमत्ता, धवल चारित्र्य, कर्मनिष्ठा, टीकेनंतरही पाळलेला संयम, प्रचंड विजय मिळाल्यावरही प्रकट केलेली निरहंकारिता घडवते त्यांच्यातील स्थितप्रज्ञतेचे आणि कर्मयोग्याचे दर्शन! गीतेतील श्लोक आठवतो,

‘दु:खेष्वनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह: ।
वीतरागभयक्रोध: स्थितधीर्मुनिरुच्यते ॥’

‘दु:खामध्ये मन उद्वीग्न न होणे, सुखात निरीच्छ राहणे, आसक्ती-भय-क्रोध नष्ट होणे व बुद्धी स्थिर राहणे अशाला मुनी म्हणतात.’ असा मोदीजींसारखा मुनी यशोगाथा रचेल यात नवल ते काय?

संसदेत प्रवेश करताना प्रथम पायरीवर माथा झुकविणाऱ्या, सर्व देशभक्तांना नमन करणाऱ्या या प्रधान सेवकाची यशोगाथा नित्य जाणून घ्यावी अशीच आहे. त्यांनीच एका ठिकाणी म्हटलंय की प्रत्येकाने एकान्त सेवन करावा. स्वत:च स्वत:बरोबर राहावे. आत्मशोध घ्यावा. यातून आपण समृद्ध होतो आणि सत्कार्याची इच्छा प्रत्यक्षात आणण्याची क्षमता प्राप्त होते. ‘मी तसं केलंय’ असं म्हणणाऱ्या मोदीजींना आणि त्यांच्या यशोगाथेला शुभेच्छांसह त्रिवार वंदन.

* * *



**संसदेत जाताना पायरीला वंदन**

**काशी कामगारांचा सत्कार करताना मोदीजी**



# श्रद्धांजली

## कथकसम्राट पं. बिरजू महाराज



जागतिक कीर्तीचे कथक सम्राट पं. बिरजू महाराज यांचे दि. १७ जानेवारी २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

आपल्या दीर्घकाळ कथक नृत्य सेवेने बिरजू महाराजांनी कथकचा प्रसार आणि जपणूक देशात-परदेशात करण्याचे महान कार्य केले. त्यांच्या कथक मधून रस, भाव, अभिनय हे परिपूर्णतेने प्रकट होत. त्रिताल हा आकाशाप्रमाणे व्यापक आहे असे मानणाऱ्या बिरजू महाराजांच्या कथक सादरीकरणाने रंगमंचाचे वृंदावन होई, प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णाचे दर्शन श्रोत्यांना होई. पंडितजींनी कथक नृत्याची परंपरा समृद्ध केली आणि तिला नविनतेचाही योग्य स्पर्श दिला. त्यांच्या मार्गदर्शनाने कथकमधील नवीन पिढीही उत्तम प्रकारे तयार झाली. भारतीय नृत्यकलेला सन्मानपूर्वक विश्वव्यापक करण्याचे महान श्रेय पंडितजींना जाते.

त्यांच्या या योगदानामुळेच २०१९ मध्ये आदित्य प्रतिष्ठानचा मानाचा 'लक्ष्मी वासुदेव कलाभूषण पुरस्कार' त्यांना प्रदान करण्यात आला. तो स्वीकारताना त्यांनी गुरुदेवांना असलेल्या कथक नृत्य ज्ञानाचा विशेष उल्लेख केला. अतिशय आनंदाने, उत्साहाने त्यांनी हा पुरस्कार स्वीकारला. कथकमधील काही भावमुद्रा सादर केल्या, त्या भावमुद्रांमधून रोजच्या जीवनाशी लय कशी संबंधित असते ते प्रभावीपणे दाखवले. भजन, ठुमरी सादर करून त्यातीलही त्यांच्या उत्तम गतीचा अनुभव श्रोत्यांना दिला. या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या श्रोत्यांना पंडितजींच्या कथक नृत्यकलेतील सत्त्व-सौंदर्याचा आगळावेगळा संगम अनुभवता आहे. यावेळी पंडितजी म्हणाले होते की कथक प्रसाराचे कार्य मी शेवटच्या श्वासापर्यंत करत राहीन. त्यांचे म्हणणे खरे ठरले! शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या कुटुंबियांसह संगीत-गायनाचा आनंद त्यांनी घेतला असा उल्लेख त्यांच्या नातीने केला आहे.

तबला, पेटी, घुंगरू यांच्या सुरांमध्ये लहानाचे मोठे झालेले पं. बिरजू महाराज कथक नृत्यकलेची आजन्म सेवा करून नव्या पिढीला उत्तम वस्तुपाठ घालून देण्याचे कार्य करते झाले.

त्यांच्या पवित्र स्मृतिला आदित्य प्रतिष्ठान परिवारातर्फे भावपूर्ण, सश्रद्ध श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

* * *

## पद्मश्री सिंधूताई सपकाळ



आयुष्यातील असंख्य अग्निदिव्यांना धाडसाने सामोरे जाऊन स्वत: निराधार असलेल्या श्रीमती सिंधुताई सपकाळ यांनी अनेक अनाथ मुलांना मायेची सावली दिली. अशा या समाजभूषण सिंधूताईंचे दि. ४ जानेवारी २०२२ या दिवशी हृदयविकाराने निधन झाले.

आदित्य प्रतिष्ठानतर्फे त्यांच्या उत्तुंग कार्यासाठी त्यांना दि. १४ एप्रिल २०१५ या मंगलदिनी लक्ष्मीवासुदेव स्त्रीशक्ती समाजभूषण गौरव पुरस्कार अर्पण करण्यात आला.

अनाथांची आई-माई असलेल्या सिंधूताई या प्रसंगी म्हणाल्या होत्या, 'कर्मभोगाच्या अंधारातून वाट काढत प्रकाशाकडे जायला निघाले. जीवनात काट्यांवरून चालावेच लागते. काटे बोचतात पण बोचण्याची वेदना काट्यांना होत नाही तर आपल्याला होते, पण आपण निर्धाराने उभे राहिलो तर काटेही झुकतात.' ही दुर्दम्य जिद्द प्रकट करणाऱ्या सिंधूताई जीवनाच्या लढाईत अशा काटेरी मार्गावरूनच चालल्या. याच जिद्दीने त्यांनी सासवडजवळ कुंभारवळण गावी 'ममता बाल सदन' उभे केले. दुर्दैवाचे अनेक कडू घोट लहान वयात गिळून अनाथांच्या जीवनात त्यांनी अपूर्व गोडवा भरला. त्यांची माय होऊन त्यांचे आयुष्य उत्तम घडवले. वर्ध्याला गोरक्षण केन्द्र उभे केले. महाराष्ट्रभर भिक्षा मागून, कविता म्हणून, भाषणे करून त्यांनी हा अनाथांचा संसार मांडला. समाजात त्यांना मानाचे स्थान मिळवून दिले. जगण्याची प्रेरणा दिली.

त्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित झाल्या. त्यामध्ये मूर्तिमंत आई-राष्ट्रीय पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार आणि अजूनही कित्येक पुरस्कार त्यांना अर्पण करण्यात आले. 'मी सिंधूताई सपकाळ' हा चित्रपट आणि 'अनाथांची यशोदा' या अनुबोधपटाने त्यांचे कार्य सर्वदूर पोहोचले. इयत्ता ९ वीच्या पाठ्यपुस्तकात (मराठी) 'घार हिंडते आकाशी' हा त्यांनी लिहिलेला पाठ घेतला गेला आहे.

समाजाने, स्वकीयांनी त्यांना प्रेमाला पारखे केले परंतु त्यांनी मात्र पोरक्या मुलांना भरभरून प्रेम दिले आणि त्यांना जगायला शिकवले. जीवनात पाय रोवून ठामपणे उभे राहिलेल्या पद्मश्री सिंधूताईंना आदित्य प्रतिष्ठानतर्फे विनम्र श्रद्धांजली!


दीनदुबळ्यांच्या जीवनात आनंद पेरत गेलेल्या सिंधूताई जरी अनंतात विलीन झाल्या तरी तो आनंद अनेकांच्या हृदयात रुजेल आणि त्यातून उमललेली सेवावृत्ती असंख्यांना मार्ग दाखवेल, प्रेरणा देत राहील.

---

**कोरोनाच्या कालखण्डात अनेक आप्त-स्वकीय व दिग्गज अनंतात विलीन झाले. त्या सर्वांना निरोप देताना संत तुकारामांचा हा 'मागणे' असलेला अभंग सदैव धारण करायचा –**

आतां देवा ऐसा करीं उपकार । देहाचा विसर पडो माझ्या ।।
तरीच हा जीव सुख पावे माझा । बरवें केशव-राजा कळों आलें ।।
ठाव देईं चित्ता राखें पायांपाशी । सकळ वृत्तींशी अखंडीत ।।
आस भय लाज चिंता काम क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा ।।
मागणें हें देवा तुज एक आतां । नाम मुखीं संत-संग देईं ।।
तुका म्हणे नको वरपंग देवा । घेई माझी सेवा भाव-शुद्ध ।।

## श्रद्धांजली



### मा. श्री. श्रीकांत अभ्यंकर

गुरुदेवांचे ज्येष्ठ बंधू श्री. श्रीकांत वासुदेव अभ्यंकर यांचे अल्पशा आजाराने मिरज येथे दि. ११ फेब्रुवारी २०२२ रोजी ८० व्या वर्षी निधन झाले.

आदित्य प्रतिष्ठानच्या सुरुवातीच्या काळापासून प्रतिष्ठानचे मिरजेचे केंद्र त्यांच्या घरी होते आणि भक्तिकोशाचे तेथील वितरण त्यांनी केले. गुरुदेव करत असलेल्या कार्याविषयी त्यांना प्रेम व आस्था होती.

श्रीयुत श्रीकांत अभ्यंकर हे मिरजेमधील प्रथितयश वकील होते.

ईश्वर त्यांना सद्गती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

ॐ शांतिः शांतिः शांतिः।

---



### मा. श्री. यशवंतराव पटवर्धन

आदित्य प्रतिष्ठानचे एक सश्रद्ध, दानशूर हितचिंतक श्री. यशवंतराव पटवर्धन यांचे दि. १४ डिसेंबर २०२१ रोजी दुःखद निधन झाले.

गुरुदेवांची प्रवचने, कीर्तने अतिशय मनापासून ते श्रवण करत. तरुणांनी हे अवश्य ऐकावं आणि त्यातून आपल्या धर्मग्रंथात काय सांगितले आहे ते समजावून घ्यावे असे ते आग्रहाने सांगत. गुरुदेवांकडून रामायण-महाभारत तरुणांनी समजावून घ्यावे असे त्यांचे मत होते.

इंजिनिअर असलेले श्री. पटवर्धन अमेय बिल्डर्सच्या माध्यमातून व्यवसाय करत होते. उत्तम पूल बांधण्यात त्यांची प्रसिद्धी होती. कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय करणारे श्री. पटवर्धन समाजपुरुषाचे आपण देणे लागतो असं मनापासून म्हणत. आदित्य प्रतिष्ठानचे कार्य दान देण्यास उत्तम आहे असा विश्वास व्यक्त करूनच त्यांनी आदित्य प्रतिष्ठानच्या भारतीय संप्रदाय या तृतीय भक्तिकोश खण्डाला एक लक्ष रुपयांची देणगी दिली होती. प्रसंगा प्रसंगाने ते प्रतिष्ठानच्या कार्याला दान देत राहिले. प्रतिष्ठानच्या कार्यावर आणि गुरुदेव अभ्यंकरांवर त्यांची नितांत श्रद्धा होती.

श्रीमती रंजनावहिनी आणि पटवर्धन परिवाराच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. प्रतिष्ठानच्या परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## वैश्विक संत विद्यापीठ – बांधकाम प्रगती















गुरुदेवांचे जन्मस्थान मिरज येथे भाजपच्या वतीने अटलबिहारी वाजपेयींच्या जयंतीनिमित्त २५ डिसेंबर २०२१ रोजी 'राष्ट्रधर्म आणि राजकारण' या विषयावरील प्रवचन आयोजित केले गेले. श्रोत्यांनी मोठ्या उपस्थितीत प्रवचन ऐकले.



कार्यक्रमात प्रथम मिरजकरांकडून गुरुदेवांचा पंचाहत्तरीनिमित्त सत्कार करण्यात आला.



डॉ. प्रभा अत्रे यांचा सन्मान करताना गुरुदेव शंकर अभ्यंकर




दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीतर्फे, 'पद्मविभूषण' मिळाल्याबद्दल 'संस्थेचे भूषण' अशा डॉ. प्रभा अत्रे यांचा सत्कार गुरुदेवांच्या हस्ते करण्यात आला. डॉ. शंकर अभ्यंकर बोलताना म्हणाले, 'भारताने जगाला अध्यात्म्य आणि संगीत या दोन देणग्या दिल्या. या दोन्हींमुळे भारताला समृद्ध, श्रीमंत अशी परंपरा लाभली आहे. त्यांनी भारतीयांचे भावजीवन समृद्ध केले. या विद्या प्रदान करणारे शिक्षागुरू आणि दीक्षागुरू असतात. आबासाहेब अत्रे शिक्षागुरू आणि डॉ. प्रभा अत्रे दीक्षागुरू आहेत.'


## आनंदवार्ता

### प्रकाशित झाला आहे

# शङ्कर रामायण - अरण्यकाण्ड

(वाल्मीकि रामायणावरील मराठी ओवीबद्ध रचना)

‘धन्य श्रीराम धन्य सीता । भारती धन्य रामकथा ।
ललाम संस्कृतीचे माथा । निरंतर ।।’




### प्रकाशित तीन खण्ड

| शङ्कर रामायण | डबलडेमी पृष्ठे | ओवीसंख्या | देणगी मूल्य रुपये |
|---|---|---|---|
| १) बालकाण्ड - | ६५६ | ११,२५४ | ३५० |
| २) अयोध्याकाण्ड - | ९६८ | १५,९७२ | ८०० |
| ३) अरण्यकाण्ड - | ६२४ | ७,६५८ | ५०० |

शङ्कर रामायण – अरण्यकाण्ड हा ग्रंथ प्रकाशित झाला असून ज्यांनी पृष्ठदान दिलेले आहे त्यांनी आपला ग्रंथ घेऊन जावा.